# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

यशवंतराव चव्हाण, नाट्यसंकुल, तळमजला, मनमाला टँक रोड,
माटुंगा-माहिम, मुंबई - ४०० ०१६.

जा. क्र. ९३०/२०१५-१६ दिनांक : ०५ जानेवारी २०१६

## (फक्त सभासदांसाठी)

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची इ. स. २०१४-१५ (१ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५) ची सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक ३१ जानेवारी २०१६ रोजी दु. २.०० वा. परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी यांचे अध्यक्षतेखाली यशवंत नाट्यमंदिर, मनमाला टँक रोड, माटुंगा-माहिम, मुंबई ४०० ०१६. येथे होणारआहे. या सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

## - सभेपुढील विषय -

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून सुधारणांसह संमत करणे.
२. इतिवृत्तातून निर्माण होणाऱ्या मुद्यांवर विचार करणे.
३. श्री. प्रमोद भुसारी यांनी कार्यकारी समिती आणि नियामक मंडळ यांच्या विरोधात सीटी सिव्हील कोर्ट मुंबई येथे दाखल केलेला सुट क्रमांक (स्टॅम्प नं. १५७९०/२०१५) व नोटीस ऑफ मोशनच्या संदर्भात मा. न्यायालयाकडून वेळोवेळी पारीत केल्या जाणाऱ्या आदेशांच्या अधिन राहून योग्य तो निर्णय घेणे.
४. नियामक मंडळाच्या दिनांक १३ सप्टेंबर २०१५ रोजी झालेल्या सभेमध्ये श्री. प्रफुल्ल फरकसे, नाट्य परिषद सदस्य यांच्या संदर्भात घेतलेल्या निर्णयासंदर्भात सर्वसाधारण सभेने अंतीम निर्णय घेणे.
५. परिषदेचा १ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीचा वार्षिक अहवाल सादर करणे व संमत करणे.
६. परिषदेचे १ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीचे हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेब सादर करणे व संमत करणे.
७. अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
८. इ. सन. २०१५-१६ या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे व संमत करणे.
९. इ. सन. २०१५-१६ या वर्षाकरिता हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
१०. सभासदांकडून रीतसर आलेल्या ठरावांवर व सूचनांवर चर्चा घडवून बहुमताने निर्णय घेणे.
११. नाट्यसंकुल प्रगतीचा आढावा घेणे व निधीविषयी विचार करणे.
१२. परिषदेच्या भावी कार्यासंबंधी विचार करणे.
१३. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांची चर्चा करणे व ठराव संमत करून बहुमताने निर्णय घेणे.

आपला

(दीपक करंजीकर)
प्रमुख कार्यवाह.

## विशेष सूचना :

१. गणसंख्येअभावी ही सभा तहकूब झाल्यास पुन्हा ती सभा त्याच जागी अर्ध्या तासानंतर वरील कामकाजासाठी भरेल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२. ज्या सभासदांना अहवाल अगर जमाखर्चासंबंधी अधिक माहिती विचारावयाची असेल त्यांना ती माहिती दि. १८ जानेवारी ते २३ जानेवारी २०१६ पर्यंत प्रतिदिनी दुपारी ४ ते सायं. ६ या वेळात परिषद कार्यालय, माटुंगा-माहिम, मुंबई ४०० ०१६ येथे पुरविण्यात येईल.
३. वार्षिक सभेत ठराव/सुचना करावयाच्या असल्यास सूचक व अनुमोदक यांच्या सहीने ठरावासह त्या अर्थाची लेखी सुचना दि. २५ जानेवारी २०१६ पर्यंत परिषदेच्या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे.
४. वार्षिक अहवाल शाखेच्या सभासदासाठी शाखेच्या कार्यालयात, तसेच मुंबईतील सभासदांसाठी मध्यवर्ती कार्यालयात दिनांक १८ जानेवारी २०१६ पासून अवलोकनार्थ उपलब्ध होईल व मागणी केल्यास उपलब्ध करून दिला जाईल.

## महत्वाचे निवेदन

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची सभासद संख्या (शाखा सभासदांसहित) एकवीस हजाराहून अधिक आहे. या सर्वांना अहवाल पाठविण्यास वाढलेला टपालखर्च करणे आर्थिक तरतुदीच्या अभावी अशक्य आहे. त्यामुळे प्रतिवर्षी होणारा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा, नाट्य संमेलन, सत्कार आणि अन्य नाट्यविषयक कार्यक्रम हे वृत्तपत्राद्वारे सभासदांना कळविण्यात येतील, तसेच सर्व कार्यक्रमांची माहिती नाट्य परिषदेच्या www.natyaparishad.org या संकेत स्थळावर उपलब्ध असेल. सर्व सभासदांनी परिषदेला याबाबतीत सहकार्य करावे ही विनंती.
आपला ईमेल आयडी पाठविल्यास वरील कार्यक्रम आपल्याला ईमेलद्वारे कळविण्यात येतील. कृपया आपला ईमेल आयडी कळवावा.